International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.6 July-Aug 2023

# सममित आणि असममित संघराज्यवाद: भारत व अमेरिका या संघराज्यांतील वरिष्ठ सभागृहातील प्रतिनिधित्वाचे राज्यनिहाय विश्लेषण

**जगदीश भागवत फड**
संशोधक (JRF), राज्यशास्त्र विभाग, डॉ. रफिक झकारिया महाविद्यालय, छ. संभाजीनगर.
ई-मेल : jagdishphad71@gmail.com
DOI-10.5281/zenodo.8354194

**सारांश:**

'सममितता' आणि 'असमितता' या मुलत: गणित विषयातील संकल्पना होत. या संकल्पनांचा राज्यशास्त्रामध्ये अवलंब करण्यात आल्याने संघराज्यवादाचा अर्थ अधिक स्पष्टतः उलगडणे शक्य झाले. भारतीय संघराज्यामध्ये वरिष्ठ सभागृहामध्ये सर्व घटकराज्यांना अमेरिकी सिनेटप्रमाणे सम-समान प्रतिनिधित्व प्रदान करण्यात आलेले नाही. भारतामध्ये राज्यसभ्येमध्ये घटकराज्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. परिणामी आल्फ्रेड स्टेपनने अमेरिकी संघराज्य प्रारूपास 'सममित' संबोधले आहे. याऊलट त्याने भारतीय संघराज्याचे वर्गीकरण 'असममित' प्रकारामध्ये केले आहे.

संघराज्याच्या भिन्न प्रारूपांचा अवलंब करण्यात आल्याने प्रस्तुत संघराज्यांमध्ये केंद्र व घटकराज्य संबंध तसेच घटकराज्यांतील परस्परांमधील संबंध भिन्नतः प्रभावित झाले आहेत. भारतीय संघराज्यामधील घटकराज्यांना लाभलेल्या असमान स्वायत्ततेमुळे केंद्र सरकार अधिक प्रबळ बनले आहे. अमेरिका संघराज्यातील (यु. एस. ए.) घटकराज्यांना सिनेटमध्ये तसेच वित्तीय आणि प्रशासकीय बाबतीत तुलनेने समान स्वायत्तता व अधिकार प्राप्त झाले आहेत. परिणामी, तेथे घटकराज्ये अधिक स्वायत्त व प्रबळ बनली आहेत.

**महत्त्वाच्या संकल्पना (Keywords)**: असममितता, सममितता, असममित संघराज्यवाद, सममित संघराज्यवाद, वरिष्ठ सभागृह.

## प्रस्तावना:

संघराज्यांमधील असममितता (Asymmetry) ही प्राचीन आहे. सद्यकाळात अस्तित्वात असणारी भारत, बेल्जियम आणि जर्मनी ही संघराज्ये असममिततेच्या आधारावर निर्माण झाली आहेत. 'असममित संघराज्यवादाची' कल्पना ही विल्यम एस. लिव्हिंग्स्टन यांच्या 'संघराज्यवादाच्या स्वरूपावर एक टीप' या लेखामध्ये सर्वप्रथम प्रकट झाली. चार्ल्स टार्ल्टन यांनी "सिम्मेट्री अँड असिम्मेट्रि अॅज एलेमंट्स ऑफ फेडरॅलीझम: ए थिअरिटीकल स्पेक्युलेशन", या लेखामध्ये विचार मांडला की, एका विशिष्ट प्रणालीमधील असममित संघराज्यीय संबंध हे विभिन्न अंतर्भूत घटकांसाठी परिवर्तनशील (variable) असतात.

भारतीय संघराज्याचा विचार करता, येथे संघराज्य व्यवस्थेचे असममित प्रारूप आढळून येते. भारतातील वरिष्ठ सभागृहामध्ये घटकराज्यांना असमान प्रतिनिधित्व प्रदान करण्यात आले आहे. परिणामी भारतीय संघराज्यामध्ये असममिततेची बैठक अधिक प्रबळ बनली. उलटपक्षी, अमेरिका संघराज्यामध्ये सर्व घटकराज्यांना सिनेटमध्ये (वरिष्ठ सभागृह) समान प्रतिनिधित्व बहाल करण्यात आले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सममित व असममित संघराज्यवाद या संकल्पनांचा अर्थ आणि भारत व अमेरिका या संघराज्यांच्या वरिष्ठ सभागृहातील राज्यनिहाय प्रतिनिधित्व संख्येबाबत विश्लेषण करण्यात आले आहे.

### सममित व असममित संघराज्यवाद या संकल्पनांची थोडक्यात ओळख:

#### १ सममित संघराज्यवाद (Symmetric Federalism):

विशिष्ट संघराज्यातील घटकराज्यांमध्ये समान स्वायत्तता आणि अधिकार आढळून येत असल्यास अशा संघराज्यास सममित संघराज्य संबोधतात. खरे पाहता, कोणतेही संघराज्य हे परिपूर्णतः सममित नसते. आल्फ्रेड स्टेपनने (२००४) संघराज्यवादाचे सममित आणि असममित संघराज्यवाद अशा २ प्रकारांत वर्गीकरण केले. त्यानुसार

यु.एस.ए., स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रेलिया इ. संघराज्ये ही असममित प्रकारची मानली जातात. अमेरिकेचा (The USA) विचार करता, सैद्धांतिकदृष्ट्या या संघराज्यामध्ये सर्व ५० राज्यांना समान स्वायत्तता व अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. परिणामी या राज्यव्यवस्थेस राजकीय विश्लेषक 'सममित संघराज्य' असे संबोधतात.

**२ असममित संघराज्यवाद (Asymmetric Federalism):**

असममित संघराज्यवाद म्हणजे विशिष्ट संघराज्यातील घटकराज्यांतील आपापसातील राजकीय, वित्तीय आणि प्रशासकीय या क्षेत्रांतील संबंध असमान स्वायत्तता आणि अधिकारांवर आधारित असणे होय. म्हणजेच संघराज्यामध्ये समाविष्ट घटकराज्यांमध्ये परस्परांत असमान स्वायत्तता आढळून येत असल्यास अशा संघराज्यास राज्यशास्त्राच्या परिभाषेत असममित संघराज्य म्हणतात. संघराज्यातील असममितता ही उर्ध्व स्तर (केन्द्र व राज्य सरकार यांमधील) तसेच क्षैतिज स्तर (घटकराज्यांमधील) या दोन्ही बाबतीत अभ्यासली जाते. उदाहरणार्थ; भारत आणि कॅनडा या संघराज्यांचे वर्गीकरण 'असममित संघराज्य' या प्रकारात केले जाते. भारताच्या राज्यसभेमध्ये आणि कॅनडाच्या सिनेटमध्ये प्रांत-निहाय असमान प्रतिनिधित्व आढळते. कॅनडामध्ये प्रांतांना सिनेटमध्ये ४ ते २४ असे भिन्न भिन्न सदस्य पाठवण्याची घटनात्मक तरतूद आहे. परिणामी हे एक असममित संघराज्य ठरते.

**१ अमेरिकेतील वरिष्ठ सभागृहात घटकराज्यांना असणारे समान प्रतिनिधित्व:**

अमेरिकेच्या राज्यघटनेतील (१७८७) कलम १, छेद ३, नुसार प्रत्येक घटकराज्याला सिनेटमध्ये प्रत्येकी २ सदस्य पाठविण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला. ही तरतूद अमेरिकेमधील सममित संघराज्यवादाचा पाया मानली जाते. याबरोबरच प्रत्येक घटकराज्यास स्वतंत्र राज्यघटना तयार करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. परिणामी अमेरिकेमध्ये सममित संघराज्यवाद अधिक रुजलेला आढळतो.

अमेरिका संघराज्यामधील वरिष्ठ सभागृहातील (सिनेट) घटकराज्यनिहाय सदस्य संख्या पुढीलप्रमाणे:

| अ.क्र. | राज्याचे नाव | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १. | अलाबामा | २ |
| २. | अलास्का | २ |
| ३. | ॲरिझोना | २ |
| ४. | आयडाहो | २ |
| ५. | आयोवा | २ |
| ६. | आर्कान्सा | २ |
| ७. | इंडियाना | २ |
| ८. | इलिनॉय | २ |
| ९. | ओक्लाहोमा | २ |
| १०. | ओरेगन | २ |
| ११. | ओहायो | २ |
| १२. | कनेक्टिकट | २ |
| १३. | कॅन्सस | २ |
| १४. | कॅलिफोर्निया | २ |
| १५. | केंटकी | २ |
| १६. | कॉलोराडो | २ |

| | | |
|---|---|---|
| १७. | जॉर्जिया | २ |
| १८. | टेक्सास | २ |
| १९. | टेनेसी | २ |
| २०. | डेलावेर | २ |
| २१. | नेब्रास्का | २ |
| २२. | नेव्हाडा | २ |
| २३. | नॉर्थ कॅरोलिना | २ |
| २४. | नॉर्थ डकोटा | २ |
| २५. | न्यू जर्सी | २ |
| २६. | न्यू मेक्सिको | २ |
| २७. | न्यू यॉर्क | २ |
| २८. | न्यू हॅम्पशायर | २ |
| २९. | पेनसिल्व्हेनिया | २ |
| ३०. | फ्लोरिडा | २ |
| ३१. | मिनेसोटा | २ |
| ३२. | मिशिगन | २ |
| ३३. | मिसिसिपी | २ |
| ३४. | मिसूरी | २ |
| ३५. | मॅसेच्युसेट्स | २ |
| ३६. | मेन | २ |
| ३७. | मेरीलँड | २ |
| ३८. | मोंटाना | २ |
| ३९. | युटा | २ |
| ४०. | ऱ्होड आयलंड | २ |
| ४१. | लुईझियाना | २ |
| ४२. | वायोमिंग | २ |
| ४३. | विस्कॉन्सिन | २ |
| ४४. | वेस्ट व्हर्जिनिया | २ |

| | | |
|---|---|---|
| ४५. | वॉशिंग्टन | २ |
| ४६. | व्हरमॉंट | २ |
| ४७. | व्हर्जिनिया | २ |
| ४८. | साउथ कॅरोलिना | २ |
| ४९. | साउथ डकोटा | २ |
| ५०. | हवाई | २ |

**तक्ता क्र. १: अमेरिका संघराज्यामधील सिनेटमधील राज्यनिहाय सदस्य संख्या.**

**२ भारतीय संसदेच्या वरिष्ठ सभागृहात घटकराज्यांना असमान प्रतिनिधित्व:**

भारतीय राज्यघटनेमध्ये (१९४९) असममित संघराज्यवादास अनुकूल असणाऱ्या अनेक तरतुदींचा समावेश आहे. राज्यघटनेच्या कलम ८० अन्वये, वरिष्ठ सभागृहातील राज्यनिहाय प्रतिनिधी संख्येविषयी तरतूद केली आहे. भारतीय संघराज्यातील घटकराज्यांना वरिष्ठ सभागृहात १ ते ३१ असे असमान प्रतिनिधित्व लाभले आहे. भारतीय संघराज्यामधील राज्यनिहाय राज्यसभा सदस्य संख्या पुढीलप्रमाणे:

| अ.क्र. | राज्याचे नाव | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १. | उत्तरप्रदेश | ३१ |
| २. | महाराष्ट्र | १९ |
| ३. | तमिळनाडू | १८ |
| ४. | बिहार | १६ |
| ५. | पश्चिम बंगाल | १६ |
| ६. | कर्नाटक | १२ |
| ७. | गुजरात | ११ |
| ८. | आंध्र प्रदेश | ११ |
| ९. | मध्य प्रदेश | ११ |
| १०. | ओडिशा | १० |
| ११. | राजस्थान | १० |
| १२. | केरळ | ९ |
| १३. | पंजाब | ७ |
| १४. | आसाम | ७ |
| १५. | तेलंगणा | ७ |
| १६. | झारखंड | ६ |
| १७. | छत्तीसगढ | ५ |

| | | |
|---|---|---|
| १८. | हरियाणा | ५ |
| १९. | हिमाचल प्रदेश | ३ |
| २०. | उत्तराखंड | ३ |
| २१. | गोवा | १ |
| २२. | अरुणाचल प्रदेश | १ |
| २३. | मेघालय | १ |
| २४. | मणिपूर | १ |
| २५. | मिझोरम | १ |
| २६. | नागालँड | १ |
| २७. | त्रिपुरा | १ |
| २८. | सिक्कीम | १ |

**तक्ता क्र. २: भारतीय संघराज्यामधील वरिष्ठ सभागृहातील राज्यनिहाय सदस्य संख्या.**

- **भारतातील केंद्रशासित प्रदेशांविषयक असममित तरतुदी:**

भारतीय संघराज्यामधील पुढील केंद्रशासित प्रदेशांना राज्यसभेमध्ये प्रतिनिधित्व नाही: अंदमान आणि निकोबार बेटे, चंदीगढ, दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव, लडाख आणि लक्षद्वीप. केवळ दिल्ली, पुदुच्चेरी आणि जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशांना राज्यसभेमध्ये प्रतिनिधित्व आहे. अशाप्रकारे केंद्रशासित प्रदेशांबाबत देखील असमान स्वायत्तता आढळते.

**निष्कर्ष:**

भारतामध्ये राज्यसभ्येमध्ये घटकराज्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. भारतीय संघराज्यामध्ये वरिष्ठ सभागृहात सर्व घटकराज्यांना समान प्रतिनिधित्व प्रदान करण्यात आलेले नाही. परिणामी, भारतीय संघराज्याचे वर्गीकरण 'असममित संघराज्य' या प्रकारामध्ये केले जाते.

संघराज्यांचा विचार करता, अमेरिका या संघराज्यामध्ये तेथील घटकराज्यांना समान स्वायत्तता व अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. परिणामी तेथे संघराज्य व्यवस्था अधिक प्रबळ बनली आहे. याऊलट भारतामध्ये संघराज्य व्यवस्था तुलनेने कमी दृढ आहे. घटकराज्यांमधील सत्तेच्या असमान वितरणामुळे फुटीरतावादी प्रवृत्ती अधिक बळकट बनतात.

भारतासारख्या खंडप्राय आणि जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या देशात असममिततेमुळे 'विविधतेमध्ये एकता' साध्य होते. तथापि, असममित तरतुदींमुळे काही घटकराज्यांना असमान वागणूक मिळते व संघराज्य व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या घटकराज्यांच्या 'समान स्वायत्ततेच्या' उद्दिष्टाला बाधा येते. याबाबतीत भारतीय संघराज्य प्रणाली ही कॅनडा या संघराज्याशी अधिक मिळती-जुळती आहे. भारतामधील काही घटकराज्यांना अधिक स्वायत्तता व अधिकार लाभले आहेत.

भारतामध्ये खऱ्या अर्थी संघराज्य अस्तित्वात येण्यासाठी असममित तरतुदींचे प्रमाण कमी करणे आवश्यक आहे. यू.एन. मध्ये सर्व सभासद देशांना समान प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. या धर्तीवर भारतातील सर्व घटकराज्यांना वरिष्ठ सभागृहामध्ये समान प्रतिनिधित्व प्रदान करणे हे घटकराज्यांच्या स्वायत्ततेसाठी व एकूणच स्पर्धात्मक विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

**६. संदर्भ:**


१) रियामे, जे. २०१५. "असिम्मेट्रिक फेडरॅलीझम अँड पिपल्स रिस्पॉन्स इन नॉर्थ इस्ट इंडिया" http://hdl.handle.net/10603/55860
२) लनाम, एल. २०२०. "असिम्मेट्रिक फेडरॅलीझम: थिअरिटीकल ओरिजीन्स अँड टॉटॉलॉजी इन द टर्म", क्वास्टीओ यूरीस
३) जाधव, टी., & शिरापूरकर, एम. २०२२. "भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया", खंड १
४) लक्ष्मीकांत, एम. २०२२. "इंडियन पॉलिटी", मॅग्रोहिल एज्यूकेशन
५) विल्यम्स, आर. २००४. "फेडरॅलीझम: ओरिजिन, ऑपरेशन, सिग्निफिकंस, द जर्नल ऑफ फेडरॅलीझम, द ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, आवृत्ती ३४(४)

६) टार्लटन, सी. “सिम्मेट्री अँड असिम्मेट्रि अॅज एलेमंट्स ऑफ फेडरॅलीझम: ए थिअरिटीकल स्पेक्युलेशन”, द जर्नल ऑफ पॉलिटिक्स, आवृत्ती २७
७) स्टेपन, ए. २००४. “मल्टिनॅशनॅलिझम डेमोक्रसी अँड असिम्मेट्रिक फेडरॅलीझम”